# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.11.2024** **वारःसोमवार**

---

1.राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील तरुणांना राजकारणात येण्याचं पंतप्रधानांचं मन की बात मधून आवाहन

2.संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होणार, उद्या राज्यघटना दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

3.महिला हिंसाचारविरोधी ‘अब कोई बहाना नही’ या अभियानाचा आज प्रारंभ

4.कॉप २९ मधल्या विकसनशील देशांना हवामान संकटाशी सामना करण्यासाठी देण्यात येणाऱ्या निधीला भारतासह अफ्रिकन देशांचा विरोध

आणि

5.ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात --- धावा, विजयासाठी

**पंतप्रधानमनकीबात**

राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील तरुणांनी मोठ्या संख्येनं राजकारणात यावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल आकाशवाणीवरील ‘मन की बात’ कार्यक्रमात बोलत होते. काल या कार्यक्रमाचा 1शे 16वा भाग होता.  अशा एक लाख तरुणांना राजकारणाशी जोडण्यासाठी देशात अनेक विशेष मोहिमा राबवल्या जातील असं ते पुढे म्हणाले.

देश दरवर्षी 12 जानेवारीला स्वामी विवेकानंदांच्या जयंतीदिनी युवा दिन साजरा करतो. येत्या युवा दिनी, स्वामी विवेकानंदांच्या 162 व्या जयंतीनिमित्त दिल्लीत 'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद' आयोजित करण्याची घोषणा त्यांनी केली.  या उपक्रमाबद्दल बोलताना ते म्हणाले,

साऊंड बाइट. – 42 सेकंद

डिजिटल लाइफ सर्टिफिकेटच्या बाबतीत वृद्धांना मदत केल्याबद्दल त्यांनी लखनऊच्या वीरेंद्रचे कौतुक केले. तसंच भोपाळच्या महेश यांनी अनेक वृद्धांना मोबाईल पेमेंट करायला शिकवल्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचं कौतुक केलं.

राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसी, तरुणांमध्ये शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना विकसित करते असं सांगून तरुणांनी मोठ्या संख्येने एनसीसीमध्ये सामील होण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं. एनसीसी कॅडेट म्हणून आपल्या दिवसांची आठवण पंतप्रधानांनी  सांगितली.

सरकारी कार्यालयातील अनेक दशके जुन्या फाइल्स आणि रद्दी काढण्यासाठी राबवण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहीमेचा उल्लेख करत मोदींनी त्याची प्रशंसा केली.

पंतप्रधान सहकार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत जागतिक सहकार परिषदेचं उद्घाटन होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या गेल्या १३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ही परिषद भारतात होत आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन करण्यात येणार आहे.

**संसद**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होईल. २० डिसेंबरपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार असून यामधे एकंदर १६ विधेयकं सादर होण्याची शक्यता आहे. वायूयान, आपत्ती व्यवस्थापन, रेल्वे, बंदरे यासह वक्फ संदर्भातल्या विधेयकांवर हिवाळी अधिवेशनात चर्चा होऊ शकते.

दरम्यान काल केंद्र सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला ३० राजकीय पक्षांचे ४२ प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत त्यांनी केलेल्या सूचनांवर संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा केली जाईल आणि लोकसभा आणि राज्यसभेत कोणत्या मुद्द्यांवर चर्चा करायची हे ठरवलं जाईल अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरोन रिजिजू यांनी दिली.
उद्या राज्यघटना दिनानिमित्त संसदेच्या संविधान सदनात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याच सदनात राज्यघटना स्वीकारण्यात आली होती.

**अभियान**

केंद्र सरकारचं महिला आणि बालविकास मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय यांच्यातर्फे, आजपासून ‘अब कोई बहाना नही’ या अभियानाचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या अभियानात, जनता, सरकार तसंच प्रमुख संबंधितांना लिंगाधारीत हिंसा समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन करण्यात येणार आहे. लिंगाधारीत हिंसेला समाप्त करण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता  निर्माण करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियानाचा एक भाग म्हणून, ‘अब कोई बहाना नही’ या शीर्षकाच्या एका लघुचित्रपटाचं प्रदर्शन यावेळी करण्यात येणार आहे. याच वेळी नई चेतना या उपक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीलाही सुरुवात होणार आहे.
दरवर्षी २५ नोव्हेंबर हा जागतिक महिला हिंसा निर्मूलन दिवस म्हणून पाळण्यात येतो.

रेल्वेमंत्री

महाराष्ट्रात नागपूर इथं आज अखिल भारतीय अनुसूचित जाती अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय मेळावा सुरू होणार आहे. दोन दिवसांच्या या मेळाव्यात आज सकाळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव मार्गदर्शन करतील. कोविडमुळे गेली पाच वर्ष संघटनेचा मेळावा होऊ शकला नाही. या संघटनेचे देशभरातील सुमारे ३० हजार कर्मचारी मेळाव्यात सहभागी होण्याची अपेक्षा आहे अशी माहिती संघटनेचे विभागीय अध्यक्ष एम. चंद्रमोहन यांनी दिली.

**इफ्फी**

गोव्यात सुरू असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात विख्यात चित्रपट निर्माता आणि अभिनेता राज कपूर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त काल चित्रपट अभिनेता रणबीर कपूर यानं विशेष कार्यक्रम सादर केला. राज कपूर यांच्या चित्रपटाला प्रेक्षकांना आपलीशी वाटणारी एक सशक्त कथा असायची त्यामुळे त्याचा प्रभाव दीर्घकाळ टिकून राहायचा असं मत त्यानं यावेळी व्यक्त केलं. डिसेंबर महिन्यात राज कपूर यांच्या गाजलेल्या चित्रपटांच्या पुनर्संचयित आवृत्तींचा समावेश असलेला विशेष देशव्यापी चित्रपट महोत्सव आयोजित करणार असल्याचं त्यानं या कार्यक्रमात जाहीर केलं.
इफ्फीमध्ये काल ४८ तासात चित्रपट निर्मिती स्पर्धा आणि फिल्म बाजार या दोन उपक्रमांची सांगता झाली.

**लष्करदिनसंचलन**

येत्या 15 जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या संचलनाची झलक असलेल्या ध्वनीचित्रफितीचं अनावरण काल गोव्यात इफ्फीमध्ये करण्यात आलं. भारतीय लष्कराचे पहिले भारतीय कमांडर-इन-चीफ म्हणून फील्ड मार्शल के.एम. करिअप्पा यांची 1949मध्ये नियुक्ती झाली. त्या घटनेच्या स्मरणार्थ लष्कर दिन संचलन आयोजित केलं जातं.
यावेळी लष्कर दिनाचं यजमानपद पुण्याकडे असून बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप आणि सेंटर इथं लष्कराचं संचलन होणार आहे. यामध्ये ड्रोन आणि रोबोटिक्स सारख्या अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांसह, युद्धसराव प्रात्यक्षिकांचा समावेश असेल.

**कॉप२९**

अझरबैजानमध्ये बाकू इथं झालेल्या कॉप २९ या हवामानविषयक परिषदेत विकसनशील देशांना हवामान संकटाशी सामना करण्यासाठी तीनशे बिलियन डॉलर्स इतका निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र भारतानं यासंदर्भातल्या कराराबरोबरच हा निर्णय स्वीकारण्याच्या पद्धतीलाही आक्षेप घेतला आहे.
भारतासह अफ्रिकेतल्या देशांनीही निधीची रक्कम खूपच कमी असल्याचं म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान मंडळाचे प्रमुख सायमन स्टील यांनीही हा करार योग्य नसल्याचं मत व्यक्त केलं.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या बॉर्डर गावस्कर कसोटी मालिकेतल्या पर्थ कसोटी सामन्यात भारताने यजमान संघापुढे विजयासाठी --- धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. आज सकाळी खेळ सुरू झाल्यानंतर आतापर्यंत ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात --- धावा झाल्या आहेत.

काल भारतानं 6 बाद 487 धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला. विराट कोहली आणि यशस्वी जैस्वालनं दमदार शतकं झळकावली. जयस्वालनं 161, विराट कोहलीनं नाबाद 100, तर के एल राहुलनं 77

धावा केल्या. कालच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या 3 गडी बाद 12 धावा झाल्या होत्या. जसप्रीत बूमराहनं 2, तर महंमद सिराजनं एक गडी बाद केला.

# **याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**